## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/११/२०१७

**१) ट्रकसहीत समान जबरीने धाक दाखवुन चोरून नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ११/११/२०१७ चे २३.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीतांनी जबरी चोरी करण्याचे उद्देशाने फिर्यादीचा आयकर कंपनीचा मीनी ट्रक क्र. एम.एच ३५ /के ११०७ किमती २,००,०००/रु देशी दारूच्या ७२५ पेट्या किमत १८,०९,६००/रु व मोबाईल किमती ३,०००/रु असा एकुण २०,१२,६००/रु चा माल जबरीने धाक दाखवुन चोरून नेल्याने फिर्यादी महेश पतिराम राजवाडे वय ३८ वर्ष रा. साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३४७,३९५,५०६, भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) कापड दुकानातील पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक ११/११/२०१७ चे २०.०० वाजता ते १२/११/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी राजकुमार कन्हैयालाल टहलानी वय ५० वर्ष रा. शिवनगरी ले आवुट लाखांदुर हा त्याचे कापड दुकान बंद करून दुकानाचे शर्टर ला कुलुप लावुन घरी गेला व दुसऱ्या दिवशी आपले कापड दुकान उघण्यास आला असता कोणीतरी अज्ञात चोराने दुकानाचे शर्टरला लावलेले दोन कुलुप बनावट चाबीने उघडुन दुकानात प्रवेश करून कांऊटर मधील पैशाचा गल्ला खोलुन गल्यात ठेवलेल्या ५०/रु दराच्या १०० नोटा, १०० /रु दराच्या ५० नोटा, ५००/रु दराच्या २४ नोटा २,०००/रु दराच्या ०४ नोटा भारतीय चलनी नोटा असा एकुन ३०,०००/रु चोरून नेल्याने फिर्यादी यांच्या रिपोर्ट तोंडी पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरखडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) ट्रक मधील सामानाची चोरी . :—**

दिनांक १०/११/२०१७ ते ११/११/२०१७ चे २२.०० ते ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी शेखर तुळशीराम साकुरे वय ५१ वर्ष रा. शुक्रवारी शुभाष वार्ड भंडारा यांनी आपले सहा चक्का ट्रक व दोन ट्रॅक्टर ट्रॉली दिवाळी आधी शास्त्री चौक भंडारा येथे काम नसल्याने उभे करून ठेवले असुन कोणीतरी अज्ञात चोराने उभ्या ट्रक मधील ॲमरान कंपनीच्या ०२ पॉवर पांढऱ्या, ०२ हायड्रोलीक जॅक, ०२ जॅक, ०२ जॅक लिव्हर, व्हील पाना, सपुंर्ण पाने सेट, स्टेपनी टायरसह असा एकुन असा एकुन ५४,१००/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गभने पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत

**४) बेकायदेशीर जमाव जमवुन तलवार व देशी कटयाने प्राणघातक हल्ला करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद .**

दिनांक १०/११/२०१७ चे १४.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी आमीर अप्सर पाशा वय २९ वर्ष रा. चिखला यातील फिर्यादीचे घराजवळील फिर्यादीचे मालकीच्या खाली जागेवर यातील आरोपी क्र. १ हा बिल्डीगचे मटेरीयल आणुन अतिक्रमण करीत असता, फिर्यादीने त्यास मनाई केली तेव्हा आरोपी क्र. १ ने फिर्यादीला शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली व बेकायदेशीर जमाव जमवुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीला शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली व बेकायदेशीर जमाव जमवुन आरोपी क्र. २ चे मदतीने फिर्यादीवर तलवार व देशी कटटयाने प्राणघातक हल्ला करून फिर्यादीचे उजवे हाताचे अंगठयाला दुखापत करून जिवाने मारण्याचा प्रयत्न केला व आरोपी क्र. ३,४,५ यांनी आरोपी क्र. १ व २ यांना गुन्हा करण्यास चितावणी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३०७,१४७,१४८,१४९,१०९,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग हे करीत आहेत.

**५) चारचाकी वाहन धोकायदक रित्या रोडवर उभी करुन दार उघडल्याने मागेहुन येणाऱ्या दोन मोटार सायकल हया दरवाज्याला आदळुन पाच जखमी :–.**

दिनांक १२/११/२०१७ चे १०.३० वा. दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन एनएच ६ रोडनी भंडारा कडे जात असतांना धोकादायक रित्या रोडवर उभी करून आपले बाजुचा दरवाजा एकाएकी उघडल्याने मागेहुन येणाऱ्या दोन मोटार सायकल हया दरवाज्याला आदळुन मोटार सायकल चालक फिर्यादी, रजनी ठवकर, रजिंत गजभिये, रिता डहलवार, ताराबाई तिजारे, तेजराम धांडे यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी पुरूषोत्तम सखाराम ठवकर वय ४८ वर्ष रा. जवाहरनगर क्वॉटर नं. जी टाईप यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,२८३,३३७,,३३८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे हे करीत आहेत.

**६) इसमाचा मृत्यु :–**

दिनांक १२/११/२०१७ चे १६.१५ वाजता दरम्यान यातील मृतक रमभजन गयानीराम ठाकुर वय ४५ वर्ष, रा. रामपुरी टोली यांचे छातीत दुखत असल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रु भंडारा येथे नेत असतांनी वाटेत मरण पावल्याने फिर्यादी उध्दव मार्कड गिलोरकर वय ३४ वर्ष, रा. रामपुरी टोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. चोले पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

७) विषारी औषध प्राशन करुन युवकांचा मृत्यु .:—

दिनांक १०/११/२०१७ चे १६.४५ वाजता दरम्यान यातील मृतक कैलाश शंकर कराडे वय २४ वर्ष रा. खांबा यांचे गावात दिनांक ०९/११/२०१७ ला मंडई असल्याने दारु पाणी पिवुन दारुच्या नशेत रात्री २२.०० वा. दर. उंदीर मारण्याची औषधी खावुन अस्वस्थ झाल्याने त्यास दिनांक १०/११/२०१७ ला सकाळी नातेवाईकांनी उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे उपचार करुन तेथुन डॉक्टर नी रेफर केल्याने त्यास सा. रु. भंडारा येथे १०.०५ वाजता मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. लेन्डे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास स.फौ. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

८) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १२/११/२०१७ चे १३.००ते १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही चिचाळ टिपॉईट ही आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी स.पो.नि पुसाटे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. मडावी पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक १२/११/२०१७ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही पालोरा बस स्थानक ही आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.ना गौतम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. गौतम पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**१०) दारुचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद .**

दिनांक १२/११/२०१७ चे १८.२० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन व्द्यारे श्वासाचे परीक्षण केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भुरर्ले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना भोंगाडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**११) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक १२/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन सिहोरा, तुमसर गोबरवाही व दिघोरी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४५ लिटर हातभट्टी दारू किंमती ३,४००/—रूपया चा माल तसेच ९०० मिली लिटर देशी दारू किंमती २५०/— रुपयाचा माल असा एकुण ३६५०/— रुपया चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १२/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०१ तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व ईतर वाहनांवरती ७४ केसेस करण्यात आलेले आहे.

13.11

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.